## शाखा

**मुंबई** – मुख्याध्यापक भवन, ४ था मजला, प्लॉट नं. ६बी, सायन (प), मुंबई ४०००२२, दूरध्वनी (०२२) ४०९०४०८, मोबाईल ९९२०१३५२३७
**सांगली** – टि.म.वि. सांगली कॅम्पस, वसंतदादा इंडस्ट्रियल इस्टेट, केसरी कार्यालयाजवळ,सांगली–४१६४१६, दूरध्वनी (०२३३)२३११९२०, मोबाईल ७५८८५८८५७३
**नवी मुंबई** – दूरध्वनी (०२२)२७५७२९९५, **सोलापूर** – दूरध्वनी (०२१७)२३०११९९, **चिपळूण** – मोबाईल ८६९८०५५७६८

**विद्यापीठांतर्गत नियुक्त करण्यात आलेले प्रचारक –**
१. श्री. अनिल पाठक (अनगाव–ठाणे) – मो. क्र. ९९७५६६५९७८ २. श्रीमती वृंदा कुलकर्णी – जर्मन भाषा (कोल्हापूर) – मो. क्र. ८८०५३२९८४४
३. ॲड. दिपिका सराफ – नृत्यकला (प्रचारक व भरतनाटयम् नृत्यकला मार्गदर्शक) (न्यू पनवेल, रायगड) – ९८३३८८९१२०

## विभागीय कार्यालय

**औरंगाबाद –** मा. मथुरादास देशमुख – मोबाईल ९९६०२९०००७
**जळगाव –** मा. योगेश लाठी – मोबाईल ९८२२४६४९३१
**अंधेरी –** मा. डॉ. अजय भार्तव – मोबाईल ७७३८७३४४४१
**पिंपरी–चिंचवड –** मा. शकुंतला माटे – मोबाईल ९८२२८०६६८७
**रायगड (महाड) –** मा. मच्छिंद्र सकपाळ – मोबाईल ७७७६०४०४२१
**नाशिक –** मा. गौरी जोशी – मोबाईल ९८९०४४५९२५
**मुंबई** – मा. भूषण पिंपळे – मोबाईल ९३२४६८०८८१
**ठाणे (वसई) –** मा. सुभाष चव्हाण – मो. क्र. ७७९८१७०९१२
**रत्नागिरी –** मा. मेधा देवस्थळी – मोबाईल ९४२३२९१९२६
**रायगड (खोपोली) –** मा. सुचिता गुरव – मोबाईल ९८८१६५६९४९

# नृत्यकला स्पर्धा

शास्त्रीय नृत्यकला या विषयाचा प्रसार व्हावा, ही सांस्कृतिक कला जोपासण्यासाठी विद्यापीठाच्या शालेय प्रसार परीक्षा विभागांतर्गत शास्त्रीय नृत्यकलेमधील विविध उपक्रम सुरु करण्यात आले आहेत. याचाच एक भाग म्हणून मागील वर्षापासून **भरतनाटयम् व कथक नृत्यकला स्पर्धेचे** आयोजन करण्यात येत आहे.

### नृत्यकला स्पर्धा (भरतनाटयम् व कथक शास्त्रीय नृत्यशैली)

| | | |
|---|---|---|
| नाव नोंदणी तारीख | – | दि. १ जुलै ते २५ जुलै २०१६ |
| स्पर्धा दिनांक | – | दि. ३० व ३१ जुलै २०१६ (नियम व अटी लागू) |
| स्पर्धा ठिकाण | – | टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे ३७ |
| पारितोषिक वितरण | – | दि. १५ ऑगस्ट २०१६ |
| सादरीकरणासाठी वेळ | – | ५ मिनीटे (वेशभूषा आवश्यक) |

नोंदणी शुल्क
**सोलो डान्स** – गट. क्र १ – इ. ५वी ते ७वी, गट क्र. २ – इ. ८ वी ते १०वी, गट क्र. ३ – खुला गट – **रु. १०० प्रत्येकी**
**ग्रुप डान्स** – खुला गट (वयाचे व इयत्तेचे बंधन नाही.) – **रु. ५०० प्रत्येक ग्रुपसाठी**

**स्पर्धेची पारितोषिके– प्रत्येक गटास खालीलप्रमाणे रोख पारितोषिके देण्यात येतात.**
**ग्रुप डान्स** – प्रथम क्रमांक – रु. १०००/–, द्वितीय क्रमांक– रु. ७५०/–, तृतीय क्रमांक – रु. ५००/–
**सर्व गटांस** – प्रथम क्रमांक – रु. ७५०/–, द्वितीय क्रमांक– रु. ५००/–, तृतीय क्रमांक – रु. ३००/–
सर्व सहभागी स्पर्धकांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येते

**सूचना : नृत्यकला स्पर्धेच्या सविस्तर माहितीसाठी tmvshaleyaprasar@gmail.com या मेल आयडी वर संपर्क साधावा. आपणांस माहिती उपलब्ध करुन दिली जाईल.**

## वार्षिक कार्यक्रम

| सप्टेंबर सत्र परीक्षा | फेब्रुवारी सत्र परीक्षा |
| --- | --- |
| शुल्कासह यादी स्वीकारणे – दि.१ जूलै ते २५ जुलै २०१६ पर्यंत | शुल्कासह यादी स्वीकारणे – दि. १ डिसेंबर ते २६ डिसेंबर २०१६ पर्यंत |
| विलंब शुल्कासह – दि. ४ ऑगस्ट २०१६ | विलंब शुल्कासह – दि. ३१ डिसेंबर २०१६ |
| परीक्षा दिनांक – सप्टेंबर / ऑक्टोबर महिन्यातील रविवार | परीक्षा दिनांक – फेब्रुवारी / मार्च २०१७ महिन्यातील रविवार |
| निकाल दिनांक – नोव्हेंबर महिन्यातील शेवटचा आठवडा | निकाल दिनांक – एप्रिल २०१७ महिन्यातील शेवटचा आठवडा |

## सप्टेंबर २०१६ सत्रातील परीक्षा कार्यक्रम

| वार व दिनांक | विषय |
| --- | --- |
| रविवार दि. १८ सप्टेंबर २०१६ | नृत्यकला (लेखी परीक्षा – मध्यमा, पदविका) |
| रविवार दि. १३ नोव्हेंबर २०१६ | नृत्यकला प्रात्यक्षिक परीक्षा (भरतनाटयम् व कथक) |

# प्रास्ताविक

शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना नृत्यकलेची आवड निर्माण व्हावी हेतूने टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे दरवर्षी नृत्यकला (भरतनाटयम् व कथक) एकूण चार (प्रारंभिक, प्रगत, मध्यमा व पदविका) परीक्षा वर्षातून फेब्रुवारी/सप्टेंबर या महिन्यांत घेतल्या जातात. या परीक्षांचा अभ्यासक्रम विद्यापीठाने तयार केला असून अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने मार्गदर्शनपर पुस्तिका विद्यापीठाने तयार केलेल्या आहेत. प्रारंभिक व प्रगत या प्रात्यक्षिक परीक्षा असतात तर मध्यमा व पदविका या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा असतात.

# नृत्यकला परीक्षांची वैशिष्ट्ये

१. दरवर्षी महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील सुमारे १०० पेक्षा जास्त नृत्यकला केंद्रांतून हजारों विद्यार्थी विद्यापीठाच्या नृत्यकला परीक्षांना बसतात.

२. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे दिली जातात. तसेच परीक्षांमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक दिले जाते.

३. परीक्षा व्यवस्थेसाठी होणारा खर्च नियमाप्रमाणे केंद्रांना दिला जातो. त्यामुळे या परीक्षा आपल्या केंद्रावर सुरू केल्यास आपणाला कोणताही आर्थिक बोजा सहन करावा लागत नाही.

४. **या परीक्षांसाठी मार्गदर्शन करणाऱ्या अध्यापकांना परीक्षा शुल्काचे २५% इतकी रक्कम अध्यापक–मानधन म्हणून दिली जाते.**

५. केंद्रांना तत्पर सेवा उपलब्ध व्हावी यासाठी निवडक जिल्हयांमध्ये विभागीय कार्यालय व विद्यापीठाच्या शाखा सुरू केल्या आहेत.

# अत्यंत महत्त्वाच्या सूचना

विद्यापीठातर्फे नृत्यकला अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेण्यात येतात. त्या संदर्भात काही महत्त्वाच्या सूचना पुढीलप्रमाणे

**प्रारंभिक परीक्षेसाठी वय वर्ष ९ व पदविका परीक्षेसाठी वय वर्ष १५ पूर्ण असणे आवश्यक आहे**

### नवीन केंद्र व केंद्र क्रमांक

१. नवीन केंद्र सुरू करावयाचे असल्यास त्यांनी विद्यार्थ्यांच्या नावांच्या यादीबरोबरच खाली दिलेल्या मुद्‌याप्रमाणे केंद्र सुरू करण्यासाठीचे विनंतीपत्र द्यावे. अगोदर केंद्र परवानगीचे मंजुरी पत्र पाठविण्याची गरज नाही. ते विद्यार्थी यादीबरोबरच पाठवावे. संबंधित केंद्रास परीक्षेच्या अगोदर विद्यार्थ्यांच्या परीक्षांच्या आसन क्रमांकांच्या यादीबरोबरच केंद्र क्रमांक कळविण्यात येईल. त्यानंतर पुढील सर्व परीक्षांसाठी तोच केंद्र क्रमांक कायम राहील.

**केंद्र सुरू करण्यासाठीच्या अर्जाचे मुद्दे** – केंद्राचे नाव – पूर्ण पत्ता ( मु.पो.,ता. जि., पिन कोड, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, ई.मेल आय डी.) – केंद्रसंचालकाचे संपूर्ण नाव

२. विद्यापीठाने दिलेला कायमचा केंद्र क्रमांक प्रत्येक यादीवर व पत्रव्यवहारावर लिहावा. परीक्षा शुल्काच्या डी.डी. च्या मागे कायमचा केंद्र क्रमांक व केंद्राचे नाव घालावे.

### शुल्क व यादी पाठविताना

१. विविध परीक्षांसाठी विद्यार्थ्यांच्या नावांची यादी पाठविताना पुढे दिलेल्या तक्त्याप्रमाणे यादी तयार करून योग्य त्या शुल्कासह पाठवावी. संगणकावार एम. एस. ऑफिस एक्सेल शीटमध्ये यादी तयार करून एक हार्ड कॉपी (प्रिंट यादी) व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) पाठवावी. किंवा विभागाच्या E-mail: tmvshaleyaprasar@gmail.com यावर Attachment मध्ये यादी पाठवावी. यापुढे जलद संपर्कासाठी मेलचा वापर केला जाणार आहे. आपणही आपला पत्रव्यवहार ई–मेल आयडीद्वारे करावा.

### यादीसाठीचा मजकूर पुढील मुद्दयानुसार असावा

केंद्राचे नाव –केंद्राचा पूर्ण पत्ता, पीन कोड, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, ई–मेल आय डी. –परीक्षेचा विषय व परीक्षेचे नाव – परीक्षा कोड क्र.–☐☐☐ (शुल्क तक्त्यावर पहावा) केंद्र क्र. –☐☐☐☐

| अनु क्र. | आडनाव | प्रथम नाव | वडिलांचे नाव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | भोईर | सायली | जगदीश | १० वर्ष |

२. विद्यार्थ्यांच्या नावांच्या याद्या (संगणकाद्वारे टंकलेखित केलेल्या) इंग्रजीतूनच पाठवाव्यात.

### शुल्काबाबत

शुल्काच्या हिशोबात सुसूत्रता येण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने सुटसुटीत शुल्काचा तक्ता तयार केला आहे.(शुल्क तक्ता पहावा) त्यानुसार **शाळांनी विभागीय कार्यालयाच्या सेवेचा जास्तीत जास्त लाभ घेऊन टपाल/कुरीयरचा खर्च वाचवावा.** नमुन्याप्रमाणे यादी पाठविताना त्यासोबत सर्व परीक्षांच्या एकत्रित किंवा प्रत्येक विषयाचा स्वतंत्र (शाळेच्या सोयीप्रमाणे) शुल्काचा हिशोब खाली दिलेल्या मुद्दयांप्रमाणे करून पाठवावा.

केंद्राचे नाव –केंद्राचा पूर्ण पत्ता, पिन कोड, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, ई–मेल इ. – परीक्षेचे नाव –

परीक्षा कोड क्र.– ☐☐☐☐ केंद्र क्र. – ☐☐☐☐☐☐ मार्गदर्शक शिक्षकाचे नाव –

| परीक्षा कोड | विषय | विद्यार्थिसंख्या X शुल्क * | रक्कम |
|---|---|---|---|
| ८१ | भरतनाट्यम् प्रारंभिक | ५० X १५० | ७५०० |
| ९३ | कथक मध्यमा | ५५ X २२५ | १२३७५ |
| | | एकूण | १९८७५ |

* शुल्क तक्ता रकाना ३ प्रमाणे विद्यापीठाकडे पाठविण्याची एकूण रक्कम – रु. १९८७५/–

बँकेचे नाव : डी.डी. नं. व दिनांक :

मुख्याध्यापक : स्वाक्षरी /शिक्का

**शुल्क पाठविताना घ्यावयाची काळजी :**

१. शुल्क पाठविताना कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्ट मा. कार्यवाह, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या नावाने काढून याद्यांसोबत विद्यापीठाच्या शालेय प्रसार परीक्षा विभागाकडे पाठवावा. डी.डी. व्यतिरिक्त आपण यूको बँकेच्या विद्यापीठाच्या खाते क्र. १६८४०११०००६१११ व बँक ऑफ महाराष्ट्रचा खाते क्र. २००२७०५२४६१ मध्ये स्थानिक बँकेच्या शाखेमधून मेल ट्रान्सफर ने शुल्क जमा करता येईल.

२. मेल ट्रान्सफर ने बँकेत पैसे भरल्याच्या मूळ पावतीची एक झेरॉक्स आपणाजवळ ठेवावी व मूळ पावती याद्यांसोबत शुल्काच्या तपशीलासह विद्यापीठाच्या शालेय प्रसार परीक्षा विभागाकडे पाठवावी. शुल्क भरल्याची पावती असेल तरच याद्या स्वीकारल्या जातील. **मनीऑर्डर स्वीकारली जाणार नाही**.

३. विद्यापीठात सोमवार ते शुक्रवार स. ११ ते १ व १.३० ते ४.३० व शनिवार स. १० ते १२ वाजेपर्यंत समक्ष याद्या व रोख शुल्क स्वीकारले जाईल. विभागीय कार्यालयात याद्या व शुल्क स्वीकारण्याच्या वेळेसाठी त्यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधावा.

**परीक्षेपूर्वी व परीक्षेनंतर**

१. पुणे परिसरातील सर्व नृत्यकला क्लासेसच्या परीक्षा (लेखी व प्रात्यक्षिक) विद्यापीठामध्ये घेतल्या जातील. त्याचप्रमाणे पुण्याव्यतिरिक्त विभागीय कार्यालयांमध्ये या परीक्षांचे आयोजन करण्यात येईल अथवा विभागीय कार्यालयातील कार्यक्षेत्राबाहेरील गावांमध्ये विद्यापीठाची पूर्व परवानगी घेवून परीक्षेस केंद्र दिले जाईल. केंद्रांच्या सर्व परीक्षा एकाच दिवशी घेण्यात येतील मात्र एखाद्या केंद्रातील विद्यार्थ्यांना विद्यापीठाने निश्चित केलेल्या तारखेस लेखी अथवा प्रात्यक्षिक परीक्षा घेणे शक्य नसल्यास सदर केंद्राच्या विनंती वरुन विद्यापीठाच्या पूर्व परवानगीने विशेष बाब म्हणून त्या केंद्राची नंतर परीक्षा घेण्यात येईल मात्र अशा केंद्रातील प्रत्येक विद्यार्थ्याकडून रु ५०/– शुल्क आकारण्यात येईल. सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षेपूवी अर्धा तास परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे.

२. भरतनाट्यम् प्रात्यक्षिक परीक्षेसाठी नट्टुअंगम (बोल म्हणण्यासाठी) साठी केंद्राचे प्रतिनिधी हवे. सीडी अथवा कॅसेट चालणार नाही. प्रारंभिक, प्रगत, मध्यमा प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पांढरा पंजाबी ड्रेस व पदविका प्रात्यक्षिक परीक्षेसाठी साडी घालणे आवश्यक आहे. भरतनाट्यम् लेखी परीक्षेसाठी अभिनयदर्पण या पुस्तकाचा अभ्यास करावा.

३. कथक प्रात्यक्षिक परीक्षेसाठी तबला व पेटी असणे आवश्यक आहे व प्रारंभिक, प्रगत, मध्यमा परीक्षेसाठी पांढरा पंजाबी ड्रेस व पदविका प्रात्यक्षिक परीक्षेसाठी आवश्यक वेशभूषा असणे आवश्यक आहे.

४. नाव नोंदणीनंतर परीक्षा वेळापत्रकानुसार परीक्षेपूर्वी १० दिवस आधी सर्व केंद्रांना परीक्षा आसनक्रमांकानुसार यादी पाठविली जाईल. लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेवळी केंद्र प्रमुखांनी शुल्क भरल्याची पावती सोबत आणावी.

५. उपस्थितिपत्रकावर परीक्षेस उपस्थित असणा–या विद्यार्थ्यांची त्याच्या नावापुढे सही घ्यावी. उपस्थितिपत्रकामध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड करू नये. यादीत नाव नसल्यास तसेच परीक्षेस ऐनवेळी बसणा–या विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव व परीक्षा शुल्क विलंब शुल्कासहित उत्तरपत्रिकेबरोबरच पाठवावे. सदर विद्यार्थ्यांस त्या परीक्षेतील शेवटचा आसन क्रमांक देऊन त्यापुढे A/B/C असे लिहावे. उदा. शेवटचा आसन क्र. १०१ असल्यास त्यापुढील ऐनवेळच्या पहिल्या विद्यार्थ्यास १०१ A दुस–या विद्यार्थ्यास १०१ B या प्रमाणे आसन क्र. द्यावेत. आसन क्रमांकाच्या यादीतील नावांमध्ये काही दुरूस्त्या असल्यास उपस्थितिपत्रकावर संबंधित नावाला/शब्दाला/अक्षराला लाल पेनने गोल करून सुधारणा करावी किंवा स्वतंत्र कागदावर आसन क्रमांकासह चुकीचे नाव व त्यापुढे सुधारित नाव अशी यादी पाठवावी. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना या नावावरच प्रमाणपत्र दिली जातात त्यामुळे विषय शिक्षकांनी नावात चूक राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

६. परीक्षा निर्णयाबाबत व प्रमाणपत्राबाबत काही शंका असल्यास निर्णय जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांपर्यंत विद्यापीठाच्या शालेय परीक्षा विभागाकडे संपर्क साधावा. परीक्षा निर्णयानंतर पुढील परीक्षेपूर्वी उत्तरपत्रिका निर्लेखित केल्या जातात.

७. परीक्षा निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून २० दिवसांच्या आत उत्तरपत्रिकांचे पुनर्निरीक्षणासंबंधीचे अर्ज मुख्याध्यापक, केंद्रसंचालक यांच्यामार्फत स्वीकारण्यात येतात. प्रत्येक उत्तरपत्रिकेसाठी रु. ३०/– याप्रमाणे पुनर्निरीक्षण शुल्क अर्जासोबत पाठवावे लागते. डुप्लिकेट प्रमाणपत्रासाठी प्रत्येकी ५०/– रुपये शुल्क आकारण्यात येते.

वरील सर्व सूचनांची नोंद घ्यावी व परीक्षेबाबत विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

**– कार्यवाह**

| परीक्षा कोड क्र. | परीक्षा | कॉलम १ * रुपये | कॉलम २ ** रुपये | कॉलम ३ *** रुपये |
|---|---|---|---|---|
| | **नृत्यकला भरतनाटयम्** | | | |
| ८१ | प्रारंभिक (प्रात्यक्षिक) | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| ८२ | प्रगत (प्रात्यक्षिक) | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| ८३ | मध्यमा (लेखी व प्रात्यक्षिक) | ३००.०० | ७५.०० | २२५.०० |
| ८४ | पदविका (लेखी व प्रात्यक्षिक) | ३००.०० | ७५.०० | २२५.०० |
| | **नृत्यकला कथक** | | | |
| ९१ | प्रारंभिक (प्रात्यक्षिक) | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| ९२ | प्रगत (प्रात्यक्षिक) | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| ९३ | मध्यमा (लेखी व प्रात्यक्षिक) | ३००.०० | ७५.०० | २२५.०० |
| ९४ | पदविका (लेखी व प्रात्यक्षिक) | ३००.०० | ७५.०० | २२५.०० |

## शुल्काचा हिशोब :

**शुल्क तक्त्यात** * कॉलम १ – विद्यार्थ्यांकडून घ्यावयाचे शुल्क, ** कॉलम २ – शाळेकडे ठेवायचे शुल्क *** कॉलम ३ – विद्यापीठाकडे पाठवावयाचे शुल्क (**कॉलम २** मध्ये अध्यापक मानधन + सेवाखर्च + केंद्रप्रमुख मानधन याचा समावेश आहे.) **टिप :** मुदतीनंतर शुल्क पाठविल्यास प्रत्येक विद्यार्थ्यांस ३०/– विलंब शुल्क आकारले जाईल.

तसेच ऐनवेळी (परीक्षेच्या दिवशी) परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांस संपूर्ण शुल्क (कॉलम १) + रु. ३० विलंब शुल्क आकारले जाईल.

# भरतनाट्यम् नृत्यकला परीक्षा अभ्यासक्रम

**परीक्षा १ ली – प्रारंभिक**

एकूण गुण १०० (प्रात्यक्षिक ६० गुण, तोंडी ३० गुण, अंतर्गत मुल्यमापन १० गुण)

**प्रात्यक्षिक –**

- कोणतेही १० अडवू तीन लयीत करणे.
- मंडलभेद करून दाखविणे श्लोकासहीत (अभिनयदर्पण प्रमाणे)
- पादभेद करणे श्लोकासहित (अभिनयदर्पण प्रमाणे)
- हातावर ताल देऊन अडवू म्हणणे फक्त पहिल्या लयीत

**तोंडी –**

- हस्तमुद्रा– असंयुक्त (श्लोक अभिनयदर्पण प्रमाणे)
- भरतनाट्यम्मधील नमस्काराचा अर्थ
- भरतनाट्यम् शब्दाचा अर्थ
- अडवूची व्याख्या

**परीक्षा २ री – प्रगत**

एकूण गुण १५० (प्रात्यक्षिक १०० गुण, तोंडी ४० गुण, अंतर्गत मुल्यमापन १० गुण)

**प्रात्यक्षिक –**

- अलारिपू तिश्र एकम् / चतुश्र एकम्
- वरील दोन्ही रचना ताल देऊन म्हणणे
- पुष्पांजली
- पंचजाति तीन लयीत करणे व ताल देऊन म्हणणे

**तोंडी –**

- नृत्यदेवता नटराज माहिती
- नृत्त, नृत्य, नाट्य थोडक्यात माहिती
- संयुक्त हस्तमुद्रा – श्लोकासहित
- ग्रीवाभेद, शिरोभेद, दृष्टिभेद, स्थानकभेद (सर्व अभिनयदर्पणानुसार)
- ७ शास्त्रीय नृत्यशैलींची नावे व प्रदेश

**परीक्षा ३ री – मध्यमा**

एकूण गुण २०० (लेखी ५०, प्रात्यक्षिक १४० गुण, अंतर्गत मुल्यमापन १० गुण)

**प्रात्यक्षिक –**

- जतिस्वरम् गाऊन व करून दाखविणे. तालात म्हणणे
- कोणतेही ३ श्लोक (नमन श्लोक)
- संयुक्त व असंयुक्त हस्तमुद्रा प्रत्येकी ५ विनियोग श्लोकासहित (अभिनयदर्पण प्रमाणे)

**लेखी –**

- भरतनाट्यम्ची माहिती व इतिहास त्यासाठी कोणाकोणाचे योगदान
- ७ शास्त्रीय नृत्यशैलींची सविस्तर माहिती
- उत्प्लवनभेद
- मुद्रा विनियोग – संयुत व असंयुत प्रत्येकी ५
- व्याख्या – दासीअट्टम, अंग, प्रत्यंग, उपांग, शोल्लू, चारी, उत्प्लवन, भ्रमरी, कोरवई, जति/तिरमाणम्

**परीक्षा ४ थी – पदविका**

एकूण गुण २५० ( लेखी ७५ गुण, प्रात्यक्षिक १६५ गुण, अंतर्गत मुल्यमापन १० गुण)

**प्रात्यक्षिक –**

- शब्दम् गाऊन व करून दाखविणे
- त्रिकाल तिरमाणम् – करणे व म्हणणे
- ३५ ताल म्हणून दाखविणे
- मुद्रा विनियोग – श्लोकासहित – असंयुत २० व संयुत १०
- कौतुकम् करणे व म्हणणे

**लेखी –**

- अभिनयदर्पण व नाटयशास्त्र ग्रंथांची ओळख व माहिती तसेच ग्रंथकारांचा परिचय
- अभिनय व त्याचे प्रकार
- कर्नाटक ताल पध्दती – तालिकेचे ज्ञान
- हस्तमुद्रा विनियोग – श्लोकासहित असंयुत २०, संयुत १०
- तांडव आणि लास्य या नृत्याच्या अंगांची माहिती व त्याचे प्रकार

---

# कथक नृत्यकला परीक्षा अभ्यासक्रम

**परीक्षा १ ली – प्रारंभिक**

एकूण गुण १०० (प्रात्यक्षिक ६० गुण, तोंडी ३० गुण, अंतर्गत मुल्यमापन १० गुण)

**प्रात्यक्षिक –**

- ५ साधे तोडे/तुकडे, ४ चक्रदार तुकडे
- तीनताल – एकपट, दुप्पट, चौपट लय पढंत करणे व लयकारी दाखविणे
- १ साधी तिहाई, १ चक्रदार तिहाई
- सर्व तोडे व चक्रदार तोडे पढंत करणे आवश्यक

**तोंडी –**

- त्रिताल, दादरा व केहरवा तालांची संपूर्ण माहिती

**व्याख्या –**लय, सम, मात्रा, टाळी, खाली, तत्कार, तिहाई, आवर्तन, तुकडा–तोडा, अभिनयदर्पणानुसार ५ असंयुक्त व ५ संयुक्त मुद्रांची नावे व उपयोग

**परीक्षा २ री – प्रगत**

एकूण गुण १५० (प्रात्यक्षिक १०० गुण, तोंडी ४० गुण, अंतर्गत मुल्यमापन १० गुण)

**प्रात्यक्षिक –**

- श्लोकांवर अभिनय
- त्रिताल, थाट, आमद, सलामी, ४ तोडे, ४ चक्रदार तोडे, २ कवित्व, तत्कार व त्याचे प्रकार (बाँठ)
- ४ गतनिकास – (सिधी गत, मटकी, घुंघट, बासरी)

**तोंडी –**

- पहिल्या (प्रारंभिक) परीक्षेच्या सर्व व्याख्या
- आमद, थाट, कवित्त, गत निकास, गतपलटा, सलामी, बाँठ, चक्रदार–तोडा/तुकडा यांच्या व्याख्या
- झपतालाची संपूर्ण माहिती
- अभिनयदर्पणानुसार १० असंयुक्त, १० संयुक्त मुद्रा व विनियोग
- कथक नृत्याची थोडक्यात माहिती

**परीक्षा ३ री – मध्यमा**

एकूण गुण २०० (लेखी ५०, प्रात्यक्षिक १४० गुण, अंतर्गत मुल्यमापन १० गुण)

**प्रात्यक्षिक –**

- गुरु वंदना
- त्रितालात विशेषता – सलामी, थाट, परनजुडी आमद, नटवरी तोडा, तिश्र जाति परन, एक फरमाईशीपरन, १ चक्रदार परन, २ कवित्त, २ तिहाई (चक्रदारतिहाई + बेदम तिहाई ), तत्कार – निमपट, एकपट, दुप्पट, चौपट
- झपताल – १ थाट, १ सलामी, १ आमद, ३ तोडे, २ साधे परन, १ चक्रदार परन, १ कवित्त, १ तिहाई, झपतालाची एकपट, दुप्पट व चौपट लयकारी करणे
- एकतालाची संपूर्ण माहिती
- गतनिकास, मोरमुकुट
  गतभाव – पनिहारी, राधाकृष्ण छेडछाड (राधाचे पाणी भरणे, कृष्णाचे मटकी फोडणे, राधाचे रागावणे इ.)
- भजन

**लेखी –**

- प्रारंभिक व प्रगत परीक्षांचा सर्व अभ्यास
- नृत्त, नृत्य, नाटय
- कथक नृत्याचा इतिहास
- एकतालाची संपूर्ण माहिती
- सरसंचालनाचे ९ प्रकार
- बोल लिपीबध्द करणे
- लोकनृत्याची व्याख्या व पंजाब, गुजरात, राजस्थान मधील लोकनृत्याची माहिती (वेशभुषा व वाद्यवृंदासहित)

**परीक्षा ४ थी – पदविका**

एकूण गुण २५० ( लेखी ७५ गुण, प्रात्यक्षिक १६५ गुण, अंतर्गत मुल्यमापन १० गुण)

**प्रात्यक्षिक –**

- तिनताल व झपताल याशिवाय एकतालात – १ थाट, १ आमद, १ सलामी, साधेतोडे, चक्रदार तोडे, साधेपरन, चक्रदार परन, कवित्त, तिहाई, बाँठ
- एकतालाची तत्काराची एकपट, दुप्पट, चौपट
- तीनताल तत्कार – निमपट, एकपट, दुप्पट, तिप्पट, चौपट, आठपट
- सर्व तालात हातावर पढंत करण्याची क्षमता

**अभिनय –**

- गतनिकास विशेषता (कलाई, झुमर, रुखसार)
- गतभाव – कालिया मर्दन
- ठुमरी
- कृष्ण वंदना

**लेखी –**

- प्रारंभिक, प्रगत, मध्यमा या तीनही परीक्षांचा सर्व अभ्यास
- २ प्रसिध्द नर्तक/नर्तकी कलाकारांची माहिती
- कथक नृत्यातील घराण्यांची विस्तृत माहिती
- अभिनय दर्पणानुसार मुद्रांचे विस्तृत ज्ञान
- लास्य – तांडव व्याख्या
- दृष्टी भेद
- महाराष्ट्रातील लोकनृत्यांची माहिती
- २ प्रसिध्द तबलावादक, २ गायक यांची फक्त नावे
- झपताल व एकतालात बोल लिपीबध्द करणे

---

आपल्या शंका, सूचना, तक्रारी यांचे जलद निवारण करण्यासाठी खालील संबंधित व्यक्तिंशी संपर्क साधावा.

• **विभागप्रमुख –** राजीव देशपांडे – ९८२३०४५७७९ **नृत्यकला,** – सुचिता भुजबळ – ८८५६९८३९८३ **शुल्काबाबत –** सुषमा खुडे – ९०११९११६७७